**ठळक बातम्या**

- भारत आणि युरोपीय संघादरम्यान मुक्त व्यापार करारांची प्रक्रीया सुरु
- जागतिक उर्जा सप्ताह परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, अर्थसंकल्प येत्या १ फेब्रुवारीला सादर होणार
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये 'पीएम सेतू' योजना राबवण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**आणि**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी माघारीची मुदत समाप्त, अंतिम उमेदवारयादी आणि निवडणूक चिन्ह वाटप साडेतीन वाजता जाहीर होणार

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एँतिनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातल्या मुक्त व्यापार जननी कराराला अंतिम स्वरूप देण्यात आलं. व्यापार, सुरक्षा, संरक्षण भागीदारी, आपत्ती व्यवस्थापन, ग्रीन हायड्रोजन आदी क्षेत्रात हे करार झाले. यामुळे भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातले संबंध अधिक दृढ झाले असून हे करार सामायिक समृद्धीसाठीचा आराखडा आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. यामुळे गुंतवणुकीला चालना मिळेल आणि जागतिक पातळीवर पुरवठा साखळी मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हा करार एक ऐतिहासिक क्षण असून यामुळे युरोपियन युनियन आणि भारत यांच्या संबंधाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे, असं युरोपियन कौन्सिलचे

अध्यक्ष एँतिनियो कोस्टा म्हणाले. तर भारताच्या प्रगतीबद्दल युरोपला अतिशय आनंद होतो आहे, असं युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन म्हणाल्या.

भारत आणि युरोपियन युनियन हे २००४ पासून धोरणात्मक भागीदार आहेत. १५ जुलै २०२० ला भारत - युरोपियन युनियन शिखर परिषद दूरस्थ पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. तसंच गेल्यावर्षी युरोपियन युनियनच्या कमिश्नर्सच्या भारत भेटीनंतर अनेक क्षेत्रात भारत आणि युरोपियन यांच्यातल्या सहकार्याचा विस्तार झाला.

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातला मुक्त व्यापार करार भारत आणि ब्रिटनमधल्या कराराला पूरक असून यामुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ऊर्जा सप्ताहानिमित्त गोव्यात आयोजित परिषदेचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीने केल्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड बाईट मोदी (२५ सेकंद)**

हा करार दोन अर्थव्यवस्थांमधल्या समन्वयाचं उत्कृष्ट उदाहरण आहे,असं प्रधानमंत्री म्हणाले. भारतात ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत असून ऊर्जा क्षेत्रासाठी भारतात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. ऊर्जा सप्ताह परिषदेमुळे जागतिक गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याची संधी निर्माण होत आहे, असं त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी, संयुक्त अरब अमिरातीचे उद्योग आणि प्रगत तंत्रज्ञान मंत्री डॉ. सुलतान अहमद अल जाबेर, कॅनडाचे ऊर्जा आणि नैसर्गिक संसाधन मंत्री टिम हॉजसन यांच्यासह आफ्रिका, मध्य पूर्व, मध्य आशिया आणि ग्लोबल साऊथमधील अनेक वरिष्ठ मंत्री उपस्थित होते.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी, आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू , राज्य मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ. एल मुरुगन बैठकीला उपस्थित होते. राज्यसभेचे सभागृह नेते जे पी नड्डा, काँग्रेसचे खासदार जयराम रमेश, द्रमुकचे तिरुची शिवा, तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव इत्यादी नेते बैठकीत सहभागी झाले.

२०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत होईल.

**<><><><><>**

बँकाचा कामकाजाचा आठवडा पाच दिवसांचा करावा या प्रमुख मागणीसाठी आज सर्व राष्ट्रीयकृत आणि सार्वजनिक बँकांचे कर्मचारी एक दिवसाच्या संपावर आहेत. बँक कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून ही मागणी करत आहेत. मात्र, वारंवार मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्यानं नाईलाजानं आपण संपावर जात आहोत, असं आंदोलक कर्मचारी संघटनांनी म्हटलं आहे. काही बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या शाखांसमोर मागणीच्या समर्थनासाठी निदर्शनंही केली. या मागणीवर विचार झाला नाही तर बेमुदत संपावर जाण्याची तयारी असल्याचं आंदोलकांनी सांगितलं. गेले तीन दिवस सुट्ट्यांमुळे बँकांचं कामकाज बंद होतं, त्यामुळे ग्राहकसेवांवर त्याचा काहीसा प्रभाव दिसून येत आहे.

**<><><><><>**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये 'पीएम सेतू' योजना राबवण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. त्यानुसार पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या जिल्ह्यांमधल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. पुढच्या टप्प्यात इतर संस्थांचा समावेश केला जाणार असल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंत्राटदार-उद्योजकांची प्रलंबित देयकं अदा करण्यासाठी ट्रेड्स प्लॅटफॉर्मची निर्मिती, धुळ्यातल्या जवाहर शेतकरी सहकारी सूतगिरणीचं पुनरूज्जीवन करण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडे शिफारस, वेगवेगळ्या कारणांसाठी दिल्या जाणाऱ्या शासकीय जमिनीच्या भाडे पट्ट्याचा कालावधी वाढवून देणं, केंद्र सरकार किंवा राज्य शासनाच्या ताब्यातल्या शत्रू संपत्तीच्या विक्री-खरेदीसाठी मुद्रांक शुल्क माफ करणं इत्यादी निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतले.

**<><><><><>**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज ३ वाजता संपली. त्यानंतर साडेतीन वाजता अंतिम उमेदवार यादी आणि निवडणूक चिन्ह वाटप जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. तर, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करावी या आणि इतर मागण्यांसाठी आदिवासी शेतकऱ्यांचा पायी मोर्चा नाशिकहून मुंबईकडे निघाला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष प्रणित किसान सभेच्या नेतृत्वाखालच्या या मोर्चात जवळपास चाळीस हजार आदिवासी शेतकरी सहभागी झाले आहेत. दिंडोरी तहसील

कार्यालयासमोर आंदोलन केल्यानंतर रविवारी, २५ जानेवारीला या मोर्चाला सुरुवात झाली. मागच्या दोन दिवसांत मोर्चेकऱ्यांनी साठ किलोमीटरचं अंतर पार केलं असून आज सकाळी मोर्चेकरी कसारा घाट उतरले. सरकारने आंदोलकांच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावलं आहे. त्यानुसार माजी आमदार जे. पी. गावित, किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर अशोक ढवळे, डॉ अजित नवले आणि आमदार विनोद निकोले मंत्रालयाकडे रवाना झाले आहेत. वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करावी, पश्चिमेकडील नद्यांवर बंधारे बांधून ते पाणी दुष्काळग्रस्त भागांसाठी उपलब्ध करून द्यावं, जिल्हा परिषद शाळेतली शिक्षकांची रिक्त पदं भरावीत आदी मोर्चेकऱ्यांच्या मागण्या असल्याचं जे पी गावित यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज केन रिचर्डसननं आज व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली. १७ वर्षांच्या प्रशंसनीय कामगिरीदरम्यान रिचर्डसन २५ एकदिवसीय आणि ३६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळला आहे. तो २०२१ चा टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघातही समाविष्ट होता.

**<><><><><>**

१९वर्षाखालील क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सुपर सिक्स फेरीत भारत आणि झिम्बाब्वे सामना होत आहे. नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी मिळाली तेव्हा भारताच्या २२ षटकात ४ बाद १६२ धावा झाल्या होत्या.

झिम्बाब्वेत सुरु असलेल्या या स्पर्धेत भारतीय संघानं चांगली कामगिरी करत आतापर्यंतचे सर्व सामने जिंकले आहेत.

**<><><><><>**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली आहे, येत्या २४ तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा, हवामान विभागाचा अंदाज आहे. रायगड जिल्ह्यात आज अवकाळी पावसाने हजेरी लावली. मुंबई उपनगर परिसरातही काही ठिकाणी पावसाचा हलका शिडकावा झाला.

**//<><><><><>//**